| MHNS240008992017 | **नियमित दिवाणी दावा क्र.५६/२०१७ मधील नि.क्र.३६ वरील आदेश** |
|---|---|
| | **प्रसाद शिवाजी पाटील** <br> **वि.** <br> **लता मुरलीधर भामरे** |

**०१.** प्रस्तुतचा दावा हा जाहिरनामा व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. नि.क्र.३६ वर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (यापुढे ज्याचा उल्लेख 'संहिता' असा करण्यात आला आहे.) चे क्रम ६, नियम १७, अन्वये दाखल केलेल्या अर्जाद्वारे प्रतिवादी हे त्यांच्या कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहेत. सदर आदेश याच अर्जावर असल्याने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्याचा या ठिकाणी अहापोह करण्यात आलेला नाही.

**०२.** वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर हरकत घेतलेली आहे. प्रतिवादी यांचा अर्ज योग्य व कायदेशिर नाही. सदर दुरुस्तीमुळे कैफियतीच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**०३.** उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा तपशिलवार युक्तिवाद ऐकला.

**०४.** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ पुढीलप्रमाणे उध्दृत करते. :–

*''१७. न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोघांपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास न्याय्य असेल अशा रितीने व अशा अट्टींवर बदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न अभिनिर्णित करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे अशा सर्व दुरुस्त्या केल्या पाहिजेत.*

*परंतु, वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, वादाची चौकशी आरंभ होण्यापूर्वी, तो पक्ष, अशी दुरुस्ती मागणी करु शकली नाही असे न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय, दाव्याच्या सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर, असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही.''*

**०५.** अभिलेखाची पाहणी केली असता वादी यांनी जाहिरनामा व निरंतर मनाई हुकूमाकरीता सदर दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झाल्यानंतर ते न्यायालयात हजर झाले व त्यांनी नि.क्र.१६ अन्वये त्यांची कैफियत/प्रतिदावा दाखल केला. प्रस्तुत दावा

प्रलंबित असतांना वादी व प्रतिवादी यांनी नि.क्र.२७ ला मोजणीकामी अर्ज दाखल केला. सदर अर्ज दि.२६/०२/२०२४ रोजी मंजुर करुन भुमिअभिलेख कार्यालय, बागलाण आदेश पाठविला. सदर आदेशाप्रमाणे दि.०५/०६/२०२४ रोजी गट क्र.४५७ व ४५६ ची भुमि अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी झाली व त्याचा अहवाल व नकाशा दि.१८/०९/२०२४ रोजी न्यायालयात दाखल केला. त्यामुळे प्रतिवादी यांनी सदर अहवाल नकाशासह हरकत नाही असा खुलासा केला तर वादी यांनी त्यावर हरकत नोंदवली. करिता प्रतिवादी हे सदर अर्जान्वये त्यांच्या कैफियतमध्ये परिच्छेद क्र.१४ नंतर १४–अ व क्र.१८ नंतर १८–ब–१ ते १८–ब–३ समाविष्ठ करुन न्यायालयीन आयुक्तांच्या अहवालाप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मागत आहे. प्रतिवादी यांची अर्जातील मागणी मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरूपात तसेच कैफियतेमध्ये कोणताही बदल होणार नाही. याउलट सदर दुरुस्तीमुळे वाद कथनामध्ये अधिक स्पष्टता येणार आहे. त्यामुळे सदर कथन कैफियतीमध्ये आल्यास, सदर दुरूस्तीमुळे प्रकरण गुणदोषावर तसेच, उभय पक्षकारांमधील वाद संपूर्ण वादाचे एकाच दाव्यामध्ये निराकारण होऊन न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे. सदर अर्ज मंजुर केल्यावर उभय पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत व गुंतागुंत वाढणार नाही. त्यामुळे, प्रतिवादीचा प्रस्तुत अर्ज संहितेचे क्रम ६, नियम १७ अन्वये मान्य करता येईल. सबब, निम्न आदेश –

## आ दे श

**०१.** नि.क्र.३६ वरील प्रतिवादीचा कैफियत दुरुस्तीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादीने या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्त प्रमाणे कैफियत व प्रतिवादाव्यामध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह अभिलेखावर दाखल कराव्यात.

SHIPKULE CHARUDATTA
Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2026.01.23 16:41:34 +0530

**दि.२३/०१/२०२६** **(सी.यु.शिपकुले)**
**ठिकाण– सटाणा.** **दिवाणी न्यायाधिश क. स्तर, सटाणा.**